पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/४/कावि/१२००/२०१७
दिनांक- २८/०९ /२०१७

**प्रति,**

**मा.----------------------------**
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ५/१०/२०१७ रोजी दुपारी २.००वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **गुरुवार दिनांक ०५/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – ०३

दिनांक- **०५/१०/२०१७** रोजी वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **गुरुवार** दिनांक ०५/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०७/९/२०१७ रोजीची रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका २) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र.१–** ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशिर्षामधून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखा शिर्षावर तरतुद वर्ग करणे बाबत...

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागामध्ये सन २०१६ -२०१७ चे अंदाज पत्रकीय तरतुद मध्ये आरोग्य विभागातील ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशीर्षावर तरतुद र.रू २३,००,०००/- करणेत आलेली आहे. नाले सफाईची र.रु १२,२३,५५७/- ची निविदा काढण्यात आली. या लेखाशिर्षावर र.रु १०,७६,४४३/- शिल्लक आहे. तसेच स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे हे लेखाशिर्षावर इ क्षेत्रीय आरोग्य विभागाकडे तरतुद करण्यात आली नाही. त्यामुळे स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे याची र. रु. ३,०१,८०६/- इतक्या रकमेची निविदा काढणेत आली आहे. या दोन्हीची एकुण र.रु. १५,२५,३६३/- वजाजाता र.रु. ७,७४,६३७/- इतकी रक्कम शिल्लक राहते. ठेकेदारपध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखाशिर्षावर आज दि. ३१/५/२०१६ रोजी र.रु. १०,०००/- इतकी तरतूद शिल्लक आहे. तसेच आर्थिक वर्ष सन २०१५-१६ मधील मे. दत्तकृपा स्वयंरोजगार संस्था यांचे इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी / हायसिंथ काढणे कामाचे उर्वरीत बील र. रु. ३९३४८/- त्या आर्थिक वर्षात तरतूद शिल्लक नसल्यामुळे सदरचे बील चालू आर्थिक वर्षात अदा करणे आवश्यक आहे त्यामुळे ठेकेदारी पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षावरुन सदरची रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे. तरी ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशिर्षामधून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखाशिर्षावर र. रु. ३५,०००/- इतकी रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असल्याने  सदरच्या विषयाबाबत अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**विषय क्र.२ - अस्थायी अस्थापना या लेखा शीर्षावरील तरतुद प्रवास भत्ता लेखा शिर्षावर वर्ग करणे बाबत...**

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागामध्ये सन २०१७ -२०१८ चे अंदाज पत्रकीय तरतुद मध्ये **प्रवास भत्ता** या लेखाशीर्षावर र. रू १००००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. दिनांक २६/६/२०१७ ते ३०/६/१७ या कालावधीमध्ये सहा.आरोग्याधिकारी श्री.प्रभाकर रामचंद्र तावरे इ क्षेत्रीय कार्यालय हे दिल्ली येथे प्रशिक्षणाकामी गेले होते. त्यांनी पुणे ते दिल्ली प्रवासाची जाणे व येण्याची विमानाची तिकीटे सादर केली असुन सदरचा खर्च रक्कम रु.१४०००/- हा प्रवास खर्च झाला आहे. तसेच भावी काळात पुन्हा सहा.आरोग्याधिकारी यांना प्रशिक्षणास जाण्याची शक्यता असलेने त्याचा येणारा आंदाजे खर्च रक्कम रु.१५०००/- तसेच पंढरपुर यात्रे निमित्त साफ सफाईच्या कामासाठी नेमणुक केलेल्या सफाई कर्मचा-यांची प्रवास भत्याची व दैनिक भत्याची रक्कम अदा करावी लागणार आहे.

सबब सध्या प्रवास भत्ता लेखा शिर्षावर सध्या असलेली र.रु.१००००/- तरतुद कमी पडत असुन, येणारा खर्च लक्षात घेता, सन २०१७ – १८ साठी सदरची तरतुद र.रु.६००००/- करणेत यावी असे प्रस्तावित वाटते त्यासाठी इ क्षेत्रिय आरोग्य विभागाच्या अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. १०००००/- इतकी तरतुद आहे. सदर तरतुदीमधुन एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ अखेर झालेला खर्च निरंक आहे.

सबब अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरुन र.रु.५००००/- इतकी तरतुद प्रवास भत्ता  लेखाशिर्षावर वर्ग करता येणे शक्य आहे तरी सदरचा प्रस्ताव मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

**विषय क्र.३–** प्रभाग क्र. ४, दिघी येथील साईपार्क कॉलनीला अदिशक्ती कॉलनी नं.१,२,३,४ अशाप्रकारे नामकरण करणेबाबत व त्यानुसार नामफलक करणेबाबत कार्यवाही करणेसाठी सदरचा विषय मा.प्रभाग समिती पुढे मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/१२००/२०१७

दिनांक- २८/०९ /२०१७